# एमएमआरसीच्या नियोजन संचालकपदी आर. रमण्णा यांची नियुक्ती

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मुंबईतील एकमेव भुयारी मेट्रो मार्गाचे कार्यचलन करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या नियोजन आणि रिअल इस्टेट डेव्हलपर्स संचालकपदी आर रमण्णा तर प्रणाली, संचलन देखभालपदी राजीव यांची नियुक्ती करण्यात आल्याचे एमएमआरसीएलने अधिकृतरित्या जाहीर केले आहे.



मुंबई मेट्रो रेलमध्ये नियोजन कार्यकारी संचालक म्हणून ९ वर्षे कार्यरत होते. यादरम्यान, मेट्रो ३ मार्गाची अंमलबजावणी, भूसंपादन, पुनर्वसन, पर्यावरण आणि इंटरमॉडल एकत्रीकरण कामे हाताळली.शहर नियोजन, वाहतूक व परिवहन, वाहतूक आणि प्रादेशिक नियोजन, वित्त, पायाभूत सुविधांची अंमलबजावणी यासाठी ३० वर्ष अनुभव रमण्णा यांच्या गाठीशी आहे. त्यांनी आयआयटी बॉम्बे येथे बाह्यपरीक्षक म्हणून देखील काम पाहिले आहे.

तर राजीव यांनी भारतीय रेल्वेमधून आपल्या कारकीर्दीला सुरुवात केली. रेल्वे आणि मेट्रो रेल्वे प्रणालीतील रोलिंग स्टॉक, ओव्हरहेड ट्रॅक्शन, वीजपुरवठा तसेच इलेक्ट्रिकल व मेकॅनिकलबाबत तीन दशकांच्या कामाचा अनुभव आहे.